VOL- VIII ISSUE- I JANUARY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# जागतिकीकरण आणि विदेशी गुंतवणूक

प्रा. डॉ. पुरुषोत्तम गाटे
कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय,
उमरी जि. नांदेड.

भारताचा व्यापार स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालावधीत चांगल्या प्रकारे विस्तार होताना दिसून येत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत व्यापाराचे महत्व वादातीत असे आहे. देशाच्या विकासासाठी विदेशी गुंतवणूकीची प्रत्येक देशाला आवश्यकता असते. भारतात सन १९९१ पूर्वी शासनाच्या ताठर व्यापारी धोरणामुळे विदेशी गुंतवणूक फार कमी प्रमाणात झाली. मात्र सन १९९१ नंतर गॅट करारामुळे भारताला आपली दारे विदेशी गुंतवणूकदारांना खुली करावी लागली. हा एक देशाच्या आर्थिक विकासातील मैलाचा दगड मानला जातो.

भारत हा विकसनसील देश म्हणून भारताची ही जगातील फार मोठी बाजापेठ असून याचा फायदा घेण्यासाठी विदेशी गुंतवणूकदारांना ती आकर्षित करत आहे. जूलै १९९१ नंतर भारताने खाजगीकरण, उदारीकरण, आणि जागतिकीकरणाची सुरुवात केली. याचा परिणाम भारतातील विविध क्षेत्रातील उद्योजकांना विदेशात तर विदेशी उद्योजकांना भारतात गुंतवणूकीच्या संधी प्राप्त झाल्या आहेत. त्याच प्रमाणे विदेशी व्यापारी, उद्योजक व शासन यांना भारतासारख्या मोठा उपभोक्ता वर्ग असणारी बाजारपेठ खुली झाली. याचा परीणाम म्हणून भारतात विदेशी गुंतवणूकीत मोठया प्रमाणात वाढ होताना दिसत आहे.

परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक म्हणजे परकीय गुंतवणूकदार त्यांची एखादी संलग्न संस्था, शाखा देशात उघडतो किंवा देशातील एखाद्या कंपनीबरोबर करार, भागीदारी करुन थेट गुंतवणूक करतो. तर परकीय अप्रत्यक्ष गुंतवणूकीमध्ये परकीय गुंतवणुकदार देशातील एखाद्या कंपनीचे शेअर विकत घेतो. यात गुंतवणूक दराच्या कंपनीवर कोणताही ताबा न राहता गुंतवणूक केलेल्या शेअर्स वर ताबा राहतो.

### भारतातील प्रत्यक्ष गुंतवणूक

भारताने जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे लक्ष निर्धारीत केले त्यासाठी सध्याच्या शासनाने परकीय गुंतवणूकदारांना विविध सवलती देउन त्यांना देशात आकर्षित करण्याचे जोरदार प्रयत्न सुरु केले आहेत. त्याला ब—याच प्रमाणात यश ही मिळत आहे. भारतात होणारी विदेशी गुंतवणूक ही प्रामुख्याने विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा २००० च्या नियमावली नुसार केली जाते. जगातील सर्वाधिक प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक अमेरीकेत झाली असून तेथे ३११बिलीयन डॉलर गुंतवणूक झाली. तर चीनचा दुसरा क्रमांक होता चीन मध्ये १४४ बिलीयन युएस डॉलर गुंतवणूक झाली असून भारताचा क्रमांक १० वा होता सन २०१८ मध्ये भारतात ४५ बिलीयन अमेरीकन डॉलर विदेशी गुंतवणूक झाली. भातात देशाच्या जीडीपीच्या १.५४ टक्के प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक झाली होती. भारतात विदेशी गुंतवणूक सातत्याने वाढत गेली आहे हे पुढील तक्त्यावरुन दिसून येते.

**तालीका क्रं. १**

**भारतातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक**

**(दशलक्ष अमेरीकन डॉलर मध्ये)**

| अ. क्रं. | आर्थिक वर्ष | प्रत्यक्ष गुंतवणूक | मागील वर्षाच्या तुलनेत % वाढ—घट | पोर्टफोलीयो गुंतवणूक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २०००—०१ | ४०२९ | — | १८४७ |
| २ | २००१—०२ | ६१३० | +५२ | १५०५ |
| ३ | २००२—०३ | ५०३५ | —१८ | ३७७ |
| ४ | २००३—०४ | ४३२२ | —१४ | १०९१८ |
| ५ | २००४—०५ | ६०५१ | +४० | ८६८६ |
| ६ | २००५—०६ | ८९६१ | +४८ | ९९२६ |
| ७ | २००६—०७ | २२८२६ | +१५५ | ३२२५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | २००७—०८ | ३४८४३ | +५३ | २०३२८ |
| ९ | २००८—०९ | ४१८७३ | +२० | १५०१७ |
| १० | २००९—१० | ३७७४५ | —१० | २९०४८ |
| ११ | २०१०—११ | ३४८४७ | —०८ | २९४२२ |
| १२ | २०११—१२ | ४६५५६ | +३४ | १६८१२ |
| १३ | २०१२—१३ | ३२२९८ | —२६ | २७५८२ |
| १४ | २०१३—१४ | ३६०४६ | +५ | ५००९ |
| १५ | २०१४—१५ | ४५१५८ | +२५ | ४०९२३ |
| १६ | २०१५—१६ | ५५५५९ | +२३ | —४०१६ |
| १७ | २०१६—१७ | ६०२२० | +८ | ७७३५ |
| १८ | २०१७—१८ | ६०९७४ | +१ | २२१६५ |
| १९ | २०१८—१९ | ६४३७५ | +६ | —३५८७ |
| | एकूण | ६०९,८३८ (७४%) | . | २१२,८८८ (२६%) |

स्त्रोत: आरबीआय बुलेटीन मार्च २०१९ टी.टी. कं. ३४

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, सन २०००—०१ ते २०१८—१९ या एकोणीस वर्षाच्या कालावधीत भारतात एकूण गुंतवणूकीत वाढ होत आहे. या कालावधीत सरासरी ७४ टक्के प्रत्यक्ष गुंतवणूक झाली आहे.

**तलीका कं. २**

**भारतातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचा प्रवाह (कोटी रुपये)**

| अ. कं. | देशाचे नांव | संचयी अंर्तप्रवाह | एकूण अंर्तप्रवाहशी प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | मॉरीशअस | ७३८१५६.०४ | ३२.०१% |
| २ | सिंगापूर | ५०५९४६.३८ | १९.७६% |
| ३ | जपान | १७३३३१.५६ | ७.२१% |
| ४ | नेदरलॅड | १६२२५१.०९ | ६.५१% |
| ५ | यु. के. | १४६३७२.०० | ६.३८% |
| ६ | अमेरीका | १४०३६९.५८ | ६.०८% |
| ७ | जर्मणी | ६५४७७.२४ | २.७९% |
| ८ | सायप्रस | ५१५४४.२५ | २.३५% |
| ९ | युएई | ३९३०९.५९ | १.५८% |
| १० | फ्रान्स | ३६८२४.६० | १.५८% |
| | एकूण | २३७८८८५.६६ | १००% |

स्त्रोत: उपरोक्त प्रमाणे

भारतात विविध देशातून प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक केली जात आहे. सन २०००—०१ मध्ये मॉरीशिअस या देशाने भारतात सर्वात जास्त विदेशी गुंतवणूक केली आहे. भारतात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचा विविध देशांचा प्रवाह वरील सासणी वरुन दिसून येतो. उपरोक्त सारणी वरुन असे निदर्शनास येते की, मॉरीशिअसचे भारतात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीत सर्वोच्च स्थान आहे. देशातील एकूण प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीच्या स्त्रोतांपैकी ३२.०१ टक्के स्त्रोत हे या देशाचे आहे. तसेच सन २०१८—१९ या कालावधीत मॉरीशिअस या देशाने १३४.४६९ मिलीयन डॉलर तर सिंगापूर ने ८२.९९८ मिलीयन डॉलर, जपान ने ३०.२७३ मिलीयन डॉलर, नेदरलॅड ने २७.३५२ मिलीयन डॉलर आणि अमेरीकेने २६.७८९ मिलीयन डॉलर भारतात विदेशी गुंतवणूक कली आहे.

**क्षेत्रनिहाय परकीय थेट गुंतवणूक**

भारतात होणा—या विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचा विचार करता विविध क्षेत्रात ही गुंतवणूक झाली आहे. याचे क्षेत्रनिहाय वर्गीकरण पुढील सारणी नुसार खालील प्रमाणे.

तालीका कं. ३

क्षेत्रनिहाय परकीय थेट गुंतवणूक

| अ. कं. | क्षेत्र | २०१८—१९ मधील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सेवा क्षेत्र | ४१६३०१.२२ | १७.६५ |
| २ | संगणक | २२१७५६.०० | ८.८७ |
| ३ | दूरसंचार | १८८२४८.८६ | ७.८२ |
| ४ | बांधकाम विकास | ११९६१३.९६ | ५.९६ |
| ५ | व्यापार | १४३५९८.८२ | ५.४८ |
| ६ | ॲटोमोबाईल उद्योग | १२३९८८.५८ | ५.०९ |
| ७ | रासायनिक उद्योग | ९१०६२.१९ | ३.९५ |
| ८ | औषधी | ८४१६४.५० | ३.८१ |
| ९ | बांधकाम पायाभूत | ९३८७२.७७ | ३.५२ |
| १० | ऊर्जा | ७७८८९.३६ | ३.४१ |
| | | | |

स्त्रोत: उपरोक्त प्रमाणे

वरील तालीके वरुन असे लक्षात येते की, भारतासारख्या कृषी प्रधान देशात सेवा क्षेत्रात

विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक ही सर्वाधिक झाली असलेली दिसून येते. त्या पाठोपाठ संगणक क्षेत्र, दूरसंचार क्षेत्रात ही गुंतवणूक झाली आहे. म्हणजेच भारतात विविध उद्योग क्षेत्रात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचे अस्तित्व असल्याचे दिसून येते. भारत सरकार विदेशी गुंतवणूकीला प्रात्साहन देण्याचा प्रयत्न करत आहे. त्याच प्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापारात भागीदारी वाढविण्यासाठी प्रशासन योग्य ती पावले उचलत आहे. शासनाने संरक्षणासारख्या महत्वाच्या क्षेत्राला विदेशी गुंतवणूकीची दारे खुली केली आहेत. तसेच विमा, बॅंकीग, रेल्वे, किरकोळ विक्री, विमान वाहतुक, औषधी इ. क्षेत्रातही ४९ टक्के ते १०० टक्के दरम्यान विदेशी गुंतवणूकीस परवानगी दिली आहे. भारतात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीतील वाढ पाहता देशात विकासास योग्य वातावरण निर्माण झाले आहे. याचा उपयोग देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी उपयोग होईल. भारतात शेती क्षेत्र महत्वाचे असल्याने या क्षेत्रात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक होणे अपेक्षित असून जेणेकरुन शेतीला नवीन तंत्रज्ञानाचा वापर होउन उत्पादनात वाढ होइल. विदेशी गुंतवणूकीचे कांही फायदे तर कांही तोटे ही संभवतात; मात्र तोटे कमीत कमी करणे हे देशाच्या आर्थिक धोरणावर अवलंबुन असते. विदेशी गुंतवणूकीमुळे देशाची अर्थव्यवस्थेला फारशे नुकसान न होता देशात नवीन रोजगार निर्मिती, नवीन उद्योग, व्यवसाय आणि वस्तुची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल.

**संदर्भ**

1. RBI Bulletin March 2019.
2. आर्थिक सर्व्हेक्षण २०१८—१९. भारत सरकार.
3. दत्त आणि सुंदरम, एस.चन्द आणि कंपनी, नई दिल्ली. २०१६.
4. गुंतवणूक आणि तंत्रज्ञान संवर्धन विभाग, विदेश व्यवहार मंत्रालय भारत सरकार.